पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
क्र.नासुकें/१/कावि/ १०२ /२०१८
दि. १६ /०३/२०१८

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अधिनियमाच्या अनुषंगाने झालेल्या बदलांबाबत व करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

**परिपत्रक,**

प्रशासनामध्ये उत्तरदायित्व, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दि.२८/०४/२०१५ रोजी लागू केला आहे. त्यानुसार आजपर्यंत एकूण ५० सेवा अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.TPS-1816/CR 452/16/UD-13 दि.२४/०८/२०१७ अन्वये बांधकाम परवानगी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या भोगवटा प्रमाणपत्र देणे, जोते प्रमाणपत्र देणे व बांधकाम परवानगी देणे या सेवांच्या नियत कालावधीत बदल करणेत आला आहे. त्यानुसार, मा.आयुक्त सो यांचे मान्यतेनुसार सुधारीत अधिसूचना क्र.नासुकें/१/कावि/९५/२०१८ दि.०८/०३/२०१८ तयार करणेत आली आहे. त्याची प्रत सोबत जोडून पाठविणेत येत आहे. त्यानुसार उक्त कार्यवाही करणेत यावी.

तसेच, वरील बाबींची अंमलबजावणी करणेबाबत याआधी आदेश क्र.नासुकें/१/कावि/३७१/२०१७ दि.२७/०९/२०१७ व परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/४४५/२०१७ दि.३०/१०/२०१७ अन्वये संबंधित विभागांना कलम ३(२) नुसार लोकसंवांची सूची, नियत कालमर्यादा, विहित नमुना किंवा फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय प्राधिकारी यांचा तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार बऱ्याच विभगांनी विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने सदरची कार्यवाही पूर्ण केलेचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

तथापि, दि.१४/०३/२०१८ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवा देणाऱ्या विभागांनी विभागाच्या बाहेर दर्शनी भागावर सदरचे फलक लावलेले दिसत नसलेने नागरीकांची गैरसोय होत असलेबाबत चर्चा झाली आहे.

सबब, संबंधित विभागांनी तात्काळ असे फलक आपले विभागाचे सूचना फलकावर अथवा दर्शनी भागावर लावावेत व नव्याने सुधारीत अधिसूचनेनुसार कार्यवाही करावी. तसेच, सदर फलक लावलेबाबतचा पूर्तता अहवाल (प्रमाणपत्र - प्रपत्र प) नागरी सुविधा केंद्र विभागाकडे दि.१९/०३/२०१८ पर्यंत पाठवावे.

**मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,**
नागरी सुविधा केंद्र,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

१) सह शहर अभियंता, बांधकाम परवानगी विभाग,
२) सह आयुक्त, करसंकलन विभाग,
३) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय विभाग,
४) सहा.आयुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग,
५) मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशामक विभाग,
६) सह शहर अभियंता, पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग,
७) उपसंचालक, नगररचना विभाग
८) क्षेत्रीय अधिकारी, सर्व क्षेत्रीय कार्यालये
(विवाह नोंदणी व मंडप ना हरकत प्रमाणपत्र)

सोबत :- पूर्वीची अधिसूचना व सुधारीत अधिसूचना
प्रमाणपत्र - प्रपत्र प

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
दि.२०/०९/२०१७.

# अधिसूचना

क्रमांक :- नासुके/१/कावि/३५२/२०१७ :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८., महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि.०४/०९/२०१७ या निर्णयानुसार, याव्दारे उक्त अधिनियमाचे प्रयोजनार्थ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपिलीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्ठामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

तथापि, खालील नमूद सेवा विहित कालावधीत लोकसेवकाने नामंजूर केल्यास संबंधित कायदा अथवा प्रचलित तरतुदीनुसारच त्यावर सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अपिल करावे लागेल.

## परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवा | विभाग | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | व्दितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | नव्याने कर आकारणी | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| २ | पुन: कर आकारणी | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ३ | कराची मागणीपत्र तयार करणे | कर संकलन | ३ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ४ | करमाफी मिळणे | कर संकलन | ७ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ५ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ६ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे / इतर मार्गाने | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ७ | स्वयंमूल्यांकन | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ८ | आक्षेप नोंदविणे | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ९ | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| १० | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी कर आकारणी | कर संकलन | १५ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सह आयुक्त |
| ११ | मालकी हक्कात बदल करणे | पाणीपुरवठा | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १२ | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे | पाणीपुरवठा | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १३ | तात्पुरते / कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे | पाणीपुरवठा | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | पुन: जोडणी करणे | पाणीपुरवठा | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १५ | वापरामध्ये बदल करणे | पाणीपुरवठा | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १६ | पाणी देयक तयार करणे | पाणीपुरवठा | ३ दिवस | मीटर निरीक्षक | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १७ | प्लंबर परवाना | पाणीपुरवठा | १५ दिवस | मुख्य लिपिक | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १८ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | पाणीपुरवठा | १५ दिवस | मुख्य लिपिक | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| १९ | थकबाकी नसल्याचा दाखला | पाणीपुरवठा | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| २० | नादुरुस्त मिटर तक्रार करणे | पाणीपुरवठा | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| २१ | अनधिकृत नळजोडणी तक्रार | पाणीपुरवठा | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| २२ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | पाणीपुरवठा | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| २३ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | पाणीपुरवठा | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| २४ | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र | आकाशचिन्ह परवाना विभाग | ७ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा.आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| २५ | मंडपासाठी ना हरकत प्रमाणपत्र | क्षेत्रीय कार्यालय | ७ दिवस | प्रशासन अधिकारी | क्षेत्रीय अधिकारी | अतिरिक्त आयुक्त |
| २६ | नवीन परवाना मिळणे | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| २७ | परवान्याचे नुतनीकरण | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| २८ | परवाना हस्तांतरण | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा.आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| २९ | परवाना दुय्यम प्रत | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३० | व्यवसायाचे नाव बदलणे | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३१ | व्यवसाय बदलणे | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३२ | परवाना धारक / भागीदाराचे नाव बदलणे | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३३ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ / कमी) | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३४ | परवाना रद्द करणे | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |
| ३५ | कालबाह्य परवान्यासाठी नुतनीकरण सूचना | आकाशचिन्ह परवाना विभाग | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | सहा. आयुक्त | अतिरिक्त आयुक्त |

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक :- ८०१.

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
दि. ०८/०३/२०१८.

## अधिसूचना (सुधारीत)

क्रमांक :- नासुकें/१/कावि/९५/२०१८ :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.TPS-1816/CR-452/16/UD-13 दि.२४/०८/२०१७ या निर्णयानुसार, याव्दारे उक्त अधिनियमाचे प्रयोजनार्थ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवांपैकी काही सेवांमध्ये बदल झालेली नियत कालमर्यादा तसेच, त्या सेवांसाठी बदल झालेले पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपिलीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

तथापि, खालील नमूद सेवा विहित कालावधीत लोकसेवकाने नामंजूर केल्यास संबंधित कायदा अथवा प्रचलित तरतुदींनुसारच त्यावर सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अपिल करावे लागेल.

### परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवा | विभाग | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | व्दितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | विवाह नोंदणी | सर्व क्षेत्रीय कार्यालये | ३ दिवस | ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी / उपअधिक्षक | क्षेत्रीय अधिकारी | आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| २ | बांधकाम परवानगी देणे | बांधकाम परवानगी विभाग | ३० दिवस | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| ३ | जोते प्रमाणपत्र देणे | बांधकाम परवानगी विभाग | ७ दिवस | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| ४ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | बांधकाम परवानगी विभाग | ८ दिवस | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| ५ | अग्निशमन ना हरकत दाखला देणे | अग्निशामक विभाग | ७ दिवस | मुख्य अग्निशामक अधिकारी | सहा.आयुक्त | अति.आयुक्त |
| ६ | अग्निशमन अंतिम ना हरकत दाखला देणे | अग्निशामक विभाग | १५ दिवस | मुख्य अग्निशामक अधिकारी | सहा.आयुक्त | अति.आयुक्त |
| ७ | प्लंबर परवाना | पाणीपुरवठा विभाग | १५ दिवस | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| ८ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | पाणीपुरवठा विभाग | १५ दिवस | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |

(श्रावण हर्डीकर)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

प्रपत्र प

# प्रमाणपत्र

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील कलम ३ (२) नुसार -------------------- ----------------------- या विभागाकडून पुरविण्यात येणा-या लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालावधी, त्या लोकसेवेंशी संबंधित पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिल प्राधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी बाबतची माहिती विभागाचे अधिनस्त कार्यालय / विभागाच्या सूचना फलकावर तसेच महानगरपालिकेच्या वेबपोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

ठिकाण :-

दिनांक :- / /२०१७

स्वाक्षरी :-

विभागप्रमुखाचे नाव :-

विभागप्रमुखाचे पदनाम :-